स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

केंद्रीय तसेच राज्य नागरी सेवांमध्ये अल्पसंख्याक समाजामधील उमेदवारांचे (मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, शिख, जैन, पारसी व ज्यू) अखिल भारतीय सेवेतील प्रमाण वाढावे याकरिता केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी अल्पसंख्याक समाजातील निवडक होतकरु १० उमेदवारांना शासन निर्णय क्रमांक अविवि-२००९/प्र.क्र..२३४/०९/का-९ दि.२० मार्च, २०१० नुसार मुंबई, नागपूर, कोल्हापूर आणि औरंगाबाद येथील राज्य प्रशासकीय सेवा प्रशिक्षण केंद्रामार्फत प्रत्येकी १० अर्हताप्राप्त अल्पसंख्याक उमेदवारांना प्रशिक्षण देण्याबाबतची योजना सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तद्नंतर अल्पसंख्याक विकास विभागाकडील शासन पत्र क्रमांक- अविवि-२०१०/प्र.क्र.४०/१०/का-९ दि.२७.०९.२०१० अन्वये यशदा, पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्यामार्फत प्रत्येकी १० अर्हताप्राप्त अल्पसंख्याक उमेदवारांना प्रशिक्षण देण्याबाबतची योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. याप्रमाणे सद्यस्थितीत पाच केंद्रामार्फत प्रशिक्षण देण्याची योजना सुरु आहे.

अल्पसंख्याक विकास विभागाच्या दि.२०.०३.२०१० च्या शासन निर्णयान्वये प्रशिक्षणार्थींसाठी विद्यावेतन प्रति प्रशिक्षणार्थीस प्रतिमहा रु. १०००/- इतके मासिक विद्यावेतन देण्यात येत होते.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.२०.१२.२०११ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व भारतीय प्रशासकीय सेवा पूर्ण प्रशिक्षण केंद्र नागपूर, औरंगाबाद व कोल्हापूर येथील विद्यार्थ्यांच्या विद्यावेतन करण्यात आलेल्या वाढीच्या धर्तीवर, अल्पसंख्याक समुदायातील १० उमेदवारांना मिळणारे विद्यावेतन सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून रु. २०००/- इतके करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

५. उमेदवारांना स्टेशनरी, वाचनालय इ.साठी लागणारा निधी रु.२५०००/- ठोक निधी देण्यात येतो. त्यानुसार विद्यावेतनापोटी प्रति प्रशिक्षणार्थी प्रतिमाह रू.२०००/-या प्रमाणे १० प्रशिक्षणार्थींसाठी १० महिन्यांसाठी रू. २०००X१०X१०= २,००,०००+२५०००= २,२५,०००/- (रू.दोन लाख पंचवीस हजार फक्त) एवढा अनुदान मुंबई, नागपूर, कोल्हापूर व औरंगाबाद या केंद्राना वितरीत करण्यात येतो.

६. सन २०१०-११ ते सन २०१६-१७ पर्यंत प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांची संख्या, त्याबाबतचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ) वर्ष निहाय उमेदवारांची संख्या-

अ. क्र.	केंद्राचे नांव	सन. २०१०-११	सन. २०११-१२	सन. २०१२-१३	सन २०१३-१४	सन २०१४-१५	सन २०१५-१६	सन २०१६-१७
१	मुंबई	९	९	९	१०	१०	१०	१०
२	नागपूर	५	०५	०७	१०	१०	१०	०७
३	औरंगाबाद	१०	१०	१०	१०	१०	१०	०६
४	कोल्हापूर	४	९	९	१०	१०	१०	१०
५	पूणे (यशदा)	८	१०	१०	१०	१०	१०	१०
		३६	४३	४५	५०	५०	५०	४३
								३१७

Scanned by CamScanner